महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांक: नाविमं/पउमा/ 615
नागपूर,
दिनांक: १७/०२/२०२३

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
नागपूर विभाग, नागपूर ( भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली, गोंदिया.)

विषय:- इ १० वी व इ १२ वी ची प्रमाणपत्रे संबंधितांना तातडीने उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ:- राज्य मंडळ, पूणे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-७/६४१ दिनांक ०७.०२.२०२३.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, , इ १० वी व इ १२ वी चे प्रमाणपत्रे ब-याच माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यायांकडे प्रलंबित आहेत. सदर प्रमाणपत्रे जन्मदिनांकाच्या पुराव्यासाठी पासपोर्ट व अन्य ठिकाणी ग्राहय धरले जातात. नागरीकांनी मागणी केल्यानंतर ते संबंधितांना तातडीने उपलब्ध होऊ शकत नाही. विशेषत: हज यात्रेकरू किंवा इतर नागरिकांना ते वेळेत न मिळाल्याने त्यांना अडचणी येत असल्याबाबत मंडळास तक्रारी प्राप्त होत आहे. त्याअनुषंगाने संबंधित शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी पुढील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांने विद्यार्थी इ १० वी व इ १२ वी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर निकालानंतर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना साधारणत:सहा महिन्यानंतर उत्तीर्णता प्रमाणपत्र दिले जाते. याबाबत विद्यार्थ्यांना आवेदनपत्र भरतेवेळी व परीक्षेचे गुणपत्रक देते वेळी नोटीसबोर्डवर अवगत करून दयावे.
२. प्रत्येक वर्षी विभागीय मंडळामार्फत माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना प्रमाणपत्र वितरीत झाल्यानंतर त्यांनी संबंधित विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र घेवून जाण्याबाबत तातडीने सुचित करावे.
३. प्रमाणपत्र वेळेत वितरीत होईल याकडे कटाक्षाने पहावे.
४. प्रमाणपत्र वितरणाचा अहवाल विभागीय मंडळात सादर करावा.
५. मागील प्रलंबित प्रमाणपत्रे संबंधितांना घेवून जाण्याबाबत सूचित करावे. संबंधितांनी मागणी केल्यानंतर ती तातडीने उपलब्ध करून देण्यात यावे.
६. व्दितीय प्रमाणपत्राची मागणी आल्यास संबंधितांना योग्य ते सहकार्य करण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे दर वर्षी माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी वितरीत केलेल्या प्रमाणपत्राचा अहवाल त्वरीत विभागीय मंडळाकडे सादर करावा, याची नोंद घ्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ नागपूर

प्रत माहीतीस्तव: १. सचिव, राज्य मंडळ, पूणे यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
२.विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभागश नागपूर यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
३.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. कार्यालय,भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली, गोंदिया यांना माहीती तथा कार्यावाहीस्तव.

C:\Users\admin\Desktop\letter 1 (Repaired).docx343